# प्रेस नोट

## ‘पीएमआरडीए’चा आशियाई विक्रम! अवघ्या ९५ दिवसांत उभी राहिली १४ मजली इमारत!

- **स्वकर्तृत्वाचा १०० दिवसांचा विक्रम मोडीत!**
- **‘आशिया’ आणि ‘इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स’मध्ये नोंद; सेक्टर १२ मधील प्रकल्पात प्रीकास्ट तंत्रज्ञानाचा चमत्कार!**

**पुणे** : पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) गृहनिर्माण आणि अभियांत्रिकी क्षेत्रात जागतिक स्तरावर आपल्या कर्तृत्वाचा नवा झेंडा फडकावला आहे. चिखली येथील ‘सेक्टर १२’ गृहनिर्माण प्रकल्पात अवघ्या ९५ दिवसांत १४ मजली इमारत उभी करण्याचा भीमकाय पराक्रम ‘पीएमआरडीए’ने केला आहे. या ऐतिहासिक कामगिरीची दखल घेत ‘आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स’ आणि ‘इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स’मध्ये या विक्रमाची सुवर्णाक्षरांनी नोंद करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, ‘पीएमआरडीए’ने यापूर्वीचा आपलाच १०० दिवसांचा जुना विक्रम मोडीत काढत बांधकामाचा नवा मापदंड प्रस्थापित केला. सोमवारी (दि. १३) चिखली येथील प्रकल्पस्थळी आयोजित दिमाखदार सोहळ्यात ‘आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स’चे परीक्षक अशोक अदाक यांनी अधिकृत प्रमाणपत्र आणि पदक देऊन ‘पीएमआरडीए’चा गौरव केला. प्राधिकरणाच्या मुख्य महानगर अभियंता रिनाज पठाण यांनी हा बहुमान स्वीकारला.

‘पीएमआरडीए’चे अध्यक्ष तथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त महानगर आयुक्त के. मंजुलक्ष्मी यांच्या मार्गदर्शनाखाली हा मैलाचा दगड गाठण्यात आला. हे अशक्यप्राय काम पूर्ण करण्यासाठी ‘बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड’च्या (B. G. Shirke Construction Technology Pvt. Ltd.) अभियंत्यांनी व कामगारांनी तीन शिफ्टमध्ये अहोरात्र काम केले. अत्याधुनिक ‘इंडस्ट्रियलाइज्ड ३-एस प्रीकास्ट आरसीसी’ तंत्रज्ञानामुळे गुणवत्तेशी कोणतीही तडजोड न करता ही इमारत विक्रमी वेळेत पूर्ण झाली. ही वास्तू पूर्णपणे भूकंपप्रतिरोधक असून, शाश्वत नागरी विकासाचे उत्तम उदाहरण ठरली आहे.

यापूर्वी मार्च २०२६ मध्ये ‘पीएमआरडीए’ने १०० दिवसांत इमारत बांधून विक्रम केला होता. मात्र, अवघ्या एका महिन्यात पुन्हा स्वतःचेच रेकॉर्ड मोडत ९५ दिवसांचे नवे लक्ष्य गाठले. यापूर्वी बांधकाम क्षेत्रातील दिग्गज ‘एल अँड टी’ कंपनीच्या नावावर ९६ दिवसांत ९६ घरे असलेली १२ मजली इमारत बांधल्याची नोंद होती; त्यावर आता ‘पीएमआरडीए’ने मात केली आहे.

**दृष्टिक्षेपात विक्रमी बांधकाम :**

- **इमारत :** १४ मजली निवासी इमारत (डी-३)
- **एकूण क्षेत्रफळ :** ९४,७२२ चौरस फूट
- **सदनिका :** ११२ (२ बीएचके)
- **कालावधी :** केवळ ९५ दिवस
- **तंत्रज्ञान :** इंडस्ट्रियलाइज्ड ३-एस प्रीकास्ट आरसीसी सिस्टिम (3-S Precast RCC System)

---

**'हे यश म्हणजे आधुनिक अभियांत्रिकीचा चमत्कार' - रिनाज पठाण**

"पीएमआरडीएच्या सेक्टर-१२ येथील गृहनिर्माण प्रकल्पात आम्ही 'मिशन ९५ डेज' हे मोठे आव्हान स्वीकारले होते. अभियांत्रिकी कौशल्य आणि अचूक नियोजनाच्या जोरावर १४ मजली 'डी-३' इमारत केवळ ९५ दिवसांत पूर्ण करून आम्ही हा टप्पा गाठला आहे. ही यशस्वी अंमलबजावणी प्रामुख्याने '३-एस प्रीफॅब टेक्नॉलॉजी' (3S Prefab Technology), 'झिरो लॅग शेड्युलिंग' आणि अहोरात्र चालणाऱ्या 'थ्री-शिफ्ट वर्किंग' मॉडेलवर आधारित आहे. या प्रकल्पात फॅक्टरी-मेड प्रीकास्ट घटकांचा वापर केल्यामुळे बांधकामाचा वेग वाढला, तसेच गुणवत्तेतही कमालीची समानता राखली गेली आणि साहित्याची नासाडी (Wastage) कमी झाली. बांधकामाच्या प्रत्येक टप्प्यावर कडक गुणवत्ता नियंत्रण (QA/QC), सुरक्षा मानके आणि डिजिटल पाळत (Digital Surveillance) ठेवण्यात आली. हा प्रकल्प केवळ विक्रम प्रस्थापित करण्यापुरता मर्यादित नसून, भविष्यातील मोठ्या प्रमाणावरील परवडणाऱ्या गृहनिर्माण प्रकल्पांसाठी हे एक 'स्केलेबल मॉडेल' ठरणार आहे. गुणवत्तेचा दर्जा राखून सर्वसामान्यांना विक्रमी वेळेत हक्काची घरे उपलब्ध करून देणे हाच आमचा मुख्य उद्देश असून, आगामी काळातही अशा तंत्रज्ञानाधारित प्रकल्पांना प्राधिकरणाचे प्राधान्य राहील." — **रिनाज पठाण** (मुख्य महानगर अभियंता, पीएमआरडीए)

---

यावेळी मुख्य वित्तीय नियंत्रक जितेंद्र कोळंबे, बांधकाम परवानगी विभागाचे संचालक अविनाश पाटील, कार्यकारी अभियंता रश्मी पाटील, शिर्के ग्रुपचे उपाध्यक्ष वाय. पी. काजळे, उपमुख्य अभियंता एन. एम. कदम, व्यवस्थापक जे. सी. राक्षे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कविता भिडे यांनी केले, तर आभार एन. एम. कदम यांनी मानले.

---

**पुरुषोत्तम सांगळे,** माहिती व जनसंपर्क अधिकारी, पीएमआरडीए, पुणे